महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX - 020 / 25536761 |
|---|---|---|
| 25536722 | 25536781 / 82 / 83 | TELEGRAM 'SECBOARD' PUNE |
| (OFF) | 25536712 (OFF) | E-MAIL : sscboardpune@gmail.com |


अत्यंत महत्वाचे/तात्काळ
परीक्षा प्राधान्य

क्रमांक :- पुविमं/शाखा ब./उ.मा./१३६ /9777
पुणे ४११ ००५
दिनांक : १३/०१/२०२१

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय:–** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) एप्रिल/मे २०२१ करीता परीक्षक/नियामक नियुक्ती करणेसाठी सर्व माध्यमनिहाय विषय शिक्षकांची ज्येष्ठता यादी अद्ययावत करणेकरिता नावे पाठविण्याबाबत.

**संदर्भ:–** राज्य मंडळांचे पत्र क्रमांक/रा.म./परीक्षा २ – ३२७७ दिनांक १४/१०/२०१५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) एप्रिल/मे २०२१ व त्यापुढील परीक्षेतील उत्तरपत्रिका तपासणी/नियमन कामाकरीता परीक्षक/नियामक यांची नियुक्ती करण्यासाठी वरील संदर्भीय पत्रानुसार पॅनल (विषय शिक्षकांची माहिती) मागविण्यात येत असून सोबतच्या पॅनलमधील रकाना क्रमांक १ ते ८ मधील माहिती परिपूर्ण भरून सोमवार दिनांक २८/०१/२०२१ पर्यंत मंडळ कार्यालयात जमा करण्यात यावी. महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा (सेवाशर्ती) नियम १९८१ मधील विहीत तरतूदीनुसार सदर सेवा अनिवार्य केली असून संबंधित सर्व शिक्षकांची माहिती मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शाळा शिक्यासह सादर करण्यात यावी.

## अतिमहत्वाच्या सूचना

१. पॅनलमध्ये सर्व विषय शिक्षकांची संपूर्ण माहिती उदा. संपूर्ण नाव, जन्मतारीख, भ्रमणध्वनी क्रमांक, शैक्षणिक अर्हता शिकवित असलेला विषय, सेवा कालावधी, परीक्षक /नियामक व मुख्य नियामक टर्न या कामाचा अनुभव तसेच शाळेचा व प्राचार्याचा भ्रमणध्वनी इ. माहिती कनिष्ठ महाविद्यालय अभिलेखावरून पडताळणी करून प्रतिस्वाक्षरी करण्यात यावी.

२. संबंधित शिक्षक दोन विषयांना शिकवित असेल तर ते **प्रथम उत्तरपत्रिका तपासत असलेला विषय व माध्यम स्पष्टपणे नमूद** करावा. विषय **(एमसीव्हीसी, माहिती तंत्रज्ञान व व्होकेशनल)** व **माध्यम** नमूद न केल्यास मंडळाकडून त्या विषयाच्या माध्यमनिहाय उत्तरपत्रिका पार्सल प्राप्त झाल्यानंतर उत्तरपत्रिका तपासून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील याची गांभिर्याने नोंद घ्यावी. तसेच पॅनलमध्ये एकच विषय शिकविणारे दोन शिक्षकांची नावे असतात अशा वेळेस दोन पैकी एका शिक्षकांचे नाव दुसरा शिकवित असलेल्या विषयास टाकण्यात यावे.

३. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची बदली झाली असल्यास जेथे बदली झाली आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता तसेच त्यांचे ऐवजी बदलीद्वारे रुजू झालेल्या

शिक्षकांची सर्व माहिती नमूद करावी. सेवानिवृत्ती बाबत व्यवस्थित माहिती देताना चालू आर्थिक वर्षी अथवा मागील वर्षी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांची सेवानिवृत्तीचा दिनांक लाल शाईने स्पष्ट नमूद करावी.

४. तसेच पॅनलमध्ये एकच विषय शिकविणारे दोन शिक्षकांची नावे नमूद केलेली असतात , अशा वेळेस दोन पैकी एका शिक्षकांचे नाव दुसरा शिकवित असलेल्या विषयास टाकण्यात यावे, म्हणजे दुस–या विषयास शिक्षक उपलब्ध होवून सर्व विषयांचे उत्तरपत्रिका तपासण्यास सोयीचे होईल, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

५. एखाद्या शिक्षकाचे निलंबन केले असल्यास अथवा प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास तसा स्पष्ट उल्लेख लाल शाईच्या पेनाने त्यांच्या नावासमोर करणे अनिवार्य आहे.

६. इंग्रजी व इतर माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे आवर्जून सूचित करण्यात येते की, आपणास मंडळाने सांकेतांक क्रमांक देताना मंडळ विनियम क्रमांक २८ (७) नुसार मंडळाच्या अत्यंत महत्वाच्या कालमर्यादित कामासाठी आवश्यक असणारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध करून देण्याच्या अटीवर आपण हमीपत्राद्वारे लिहून दिले आहे. त्यानुसार आपणास मंडळाकडून सांकेतांक क्रमांक देण्यात आलाॅ आहे. तेव्हां मंडळ विनियम : क्रमांक २८ (७) नुसार एप्रिल/मे २०२१ परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणेच्या कामासाठी आवश्यक असणारी विषयनिहाय शिक्षक मंडळास उपलब्ध करून देण्यात यावेत.तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नावे कार्यालयास कळविण्यास किंवा पेपर तपासनीस नकार दिल्यास मंडळाने कनिष्ठ महाविद्यालयास दिलेला सांकेतांक क्रमांक रद्द करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

७. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विहित मुदतीत निकाल जाहीर करणे बंधनकारक असून त्यासाठी विषय शिक्षकांनी उत्तरपत्रिकांचे परीक्षण/नियमन कालमर्यदित करावयाचे आहे. त्याकरिता सोबतच्या पॅनलवर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांची परिपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे. न्यायालयाचा अवमान होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी, त्याचप्रमाणे सदर मंडळाचे काम हे (सेवा) अत्यावश्यक सेवा असल्याने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना मंडळ कामाच्या कालावधीत इतर कामातून सूट देण्यात यावी. जेणेकरून शिक्षकांकडून उत्तरपत्रिकांचे परीक्षण/नियमन काटेकोरपणे होवून विद्यार्थ्यांचे हित जपले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

८. जे शिक्षक ज्या विषयाचे मूल्यांकन करतात तोच विषय प्रामुख्याने क्र. ४ मध्ये नमूद करावा. अन्यथा दोन विषय नमूद केल्यास दोन्ही विषयाची उत्तरपत्रिका तपासून घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील यांची नोंद घ्यावी.

सदरच्या पॅनलवरील माहिती विनाविलंब व मंडळाने दिलेल्या निर्धारित वेळेत व मुदतीत मंडळ कार्यालयात सादर करण्यात यावी. यासाठी मंडळाकडून स्मरणपत्र अथवा कार्यालयीन दुरध्वनीवरून सुचित करण्याची आवश्यकता भासणार नाही असे पहावे.

**टीप – सोबत देण्यात आलेल्या स्विकृतीपत्र नमुन्यामध्ये परीक्षक नियामक यांची स्वतंत्ररित्या विषय निहाय माहिती भरून पाठविण्यात यावी.**

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

प्रत माहितीस्तव.

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे,
२. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/ सोलापूर

आपल्या कार्यक्षेतील मंडळ मान्यताप्राप्त सर्व माध्यमांच्या कनिष्ठ महाविद्यालयांना एप्रिल/मे २०२१ परीक्षेच्या अंत्यत महत्वाच्या कालमर्यादीत व गोपनीय कामाच्या अनुषंगाने उत्तरपत्रिका तपासणे विषयी विषय शिक्षकांची माहिती मंडळाने ठरवून दिलेल्या निर्धारित वेळेत सादर करणेविषयीची सत्वर कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे.

# स्विकृतीपत्र नमुना

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे – ४११ ००५.

विषय –
माध्यम –
परीक्षक/नियामक क्र. –

पेपर – १/२

**विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी परीक्षक/नियामक/मुख्य नियामक यांचे अंतिम स्विकृतीपत्र सादर करणेबाबत**

महोदय,

मी आपल्या संदर्भीय पत्रास अनुसरून परीक्षेसाठी एप्रिल/मे २०२१ परीक्षक/नियामक/मुख्य नियामक नियुक्तीसाठी माझी माहिती पुढीलप्रमाणे सादर करत आहे. (संपूर्ण नाव कॅपिटल अक्षरात इंग्रजीमध्ये देणे)

१. संपुर्ण नाव –
२. घरचा पत्ता –
३. शाळा/क.महा. चे नाव –
   सांकेतांक क्रमांक –
४. अनुदानाचा प्रकार – १) अनुदानीत २) विनाअनुदानीत ३). कायम विनाअनुदानीत
   ४) अंशतः अनुदानीत ५) स्वयं अर्थसहायित (सदर बाब स्पष्ट नमूद करणे)
५. दुरध्वनी क्र. (शाळा/क.महा.) –
६. सेवेचा तपशील –

| पदवी पात्रता | पदवी चे विषय | बी.एड. अध्यापन पद्धत | इ. १२ वी ला उत्तरपत्रिका मूल्याकंनाचा विषय | अध्यापनाचा अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | |
| | | | | | |

यापूर्वी परीक्षक/नियामक म्हणुन काम केलेले असल्यास पुढील माहिती भरावी. नसल्यास निरंक असे नमद करावे.

| कोणत्या विषयासाठी | परीक्षक टर्न | नियामक टर्न | मुख्य नियामक टर्न | प्राश्निक/भाषांतरकार टर्न |
|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | |

७. जन्म तारीख
८. सेवेचा नियुक्ती दिनांक –
९. सेवेचा निवृत्ती दिनांक –
१०. सक्षम अधिकाऱ्याची नियुक्तीस मान्यता आहे काय? होय/नाही.
११. अंतिम स्विकृतीपत्र कोणत्याही परीस्थितीत रद्द करण्यात येणार नी याची नोंद घ्यावी.

मुख्याध्यापक/प्राचार्य
(स्वाक्षरी व शिक्का)

(विषय शिक्षक स्वाक्षरी)